| MHBI150000792026 | दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३३/२०२६ मधील निशाणी क्र. १ खालील आदेश<br>अशोक बाजीराव वाघीरे व इतर<br>विरुध्द कोणीही नाही. |
|---|---|

१. अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे कथन असे की, बाजीराव पंडितराव वाघिरे हे मौजे दासखेड, ता. पाटोदा, जि. बीड येथील रहिवाशी होते व ते दिनांक २७.१०.२०२० रोजी मौजे दासखेड ता. पाटोदा, जि. बीड येथे मयत झालेले आहेत. तसेच मयताची पत्नी नामे राधाबाई बाजीराव वाघिरे हया दि. ०९.०८.२०२३ रोजी दासखेड येथे मयत झालेल्या आहेत. मयताची आई नामे रुक्मीन पंडितराव वाघिरे व वडिल नामे पंडितराव वाघिरे हे दोघेही पूर्वीच मयत झालेले आहेत. मयताचे अर्जदार क्र.१ ते अर्जदार क्र. ३ हे मुले असे नातेसंबंध अर्जदारांचे मयताशी आहेत. मयतास अर्जदारांव्यतिरिक्त इतर कोणीही वर्ग–१ चे कायदेशीर वारस नाहीत. बाजीराव पंडितराव वाघिरे यांचा मृत्यू झाल्यानंतर अर्जदार यांनी त्यांच्या शासकीय कामकाजासाठी संबंधित कार्यालयात गेला असता संबंधीत अधिका–यांनी त्यांना सक्षम न्यायालयाकडून वारस प्रमाणपत्र हजर करणेच्या सुचना दिली. त्यामुळे अर्जदार यांनी ते मयताचे कायदेशीर वारस असलेबाबतचा प्रमाणपत्र मिळणेबाबत प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्जदारांचे मागणीप्रमाणे दिनांक २३–०१–२०२६ रोजी "दैनिक बीड चंपावतीपत्र" या वृत्तपत्रातील जिल्हा बीड अवृत्ती मध्ये जाहीर नोटीसीव्दारे जाहीरनामा (निशाणी क्र.१०) प्रसीध्द करण्यात आले. नोटीसीच्या प्रसीध्दीनंतर आजतागायत प्रस्तुत अर्जाबाबत कोणीही कसलीही तक्रार उपस्थीत केलेली नाही.

**४.** अर्जदार क्र.२ यांनी स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र (निशाणी क्र.११) दाखल केले आहे. शपथपत्रातील मजकुर हा मुळ अर्जातील कथनांची पुर्नरावृत्ती करणारा असुन दाखल कागदपत्रांशी सुसंगत आहे. अर्जदार यांनी त्यांचे कथनांचे पुष्ठयार्थ कागदोपत्री पुरावा म्हणजे बाजीराव पंडितराव वाघिरे यांच्या मृत्यू दाखल्याची सत्यप्रत (निशाणी क्र.६), मयताची पत्नी नामे राधाबाई यांच्या मृत्यू दाखल्याची सत्यप्रत (निशाणी क्र.७), अर्जदार क्र.१ ते ३ यांच्या आधारकार्डच्या सत्यप्रती (निशाणी क्र. ४ अनु.क्र.३ ते ५) दाखल केल्या आहेत. अर्जदार यांनी पुरावा संपलेची पुरसिस (निशाणी क्र.१२) दाखल केलेली आहे. दाखल कागदपत्रे हे अर्जदारांच्या कथनास पुष्ठी देणारे आहेत.

**५.** अर्जदार यांच्या तर्फे विधीज्ञ श्री. यु.बी.जाधव यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. अर्जदारांतर्फे विधीज्ञ यांनी अर्जातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केला.

**६.** अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मयत बाजीराव पंडितराव वाघिरे हे अर्जदार क्र.१ ते ३ यांचे वडिल होते. मयत बाजीराव पंडितराव वाघिरे यांचे मृत्यू दाखल्याचे (निशाणी क्र. ६) अवलोकन केले असता असे दिसून येते की, ते दिनांक २७.१०.२०२० रोजी मयत झालेचे दिसुन येते. तसेच मयताची पत्नी नामे राधाबाई यांच्या मृत्यू दाखल्याचे (निशाणी क्र. ७) अवलोकन केले असता त्या दि. ०९.०८.२०२३ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. अर्जदार यांचे अर्जास जाहीर नोटीस प्रसिध्द करुनही कोणीही हरकत उपस्थित केलेली नाही. त्यामुळे अर्जदार यांचे सर्व कथने विनाअव्हानीत राहीलेली असुन ते सकृतदर्शनी विश्वासार्ह आहेत. तसेच दाखल कागदोपत्री पुराव्यामुळे अर्जदारांच्या तोंडी पुराव्यास पुष्ठी मिळते. अर्जदारांचे मयताशी असलेले नातेसंबंधांचा विचार करता हिंदु वारसा अधीनियम १९५६ प्रमाणे अर्जदार हे वर्ग १ या दर्जाचे वारस असल्याचे सकृतदर्शनी स्पष्ट होते.

**७.** उपरोक्त विवेचनाअंती, अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत बाजीराव पंडितराव वाघिरे यांचे कायदेशीर वारस असल्याचे दिसून येत आहेत. तसेच अर्जदार यांचा अर्ज मंजूर करणेस पात्र असल्याचे दिसुन येते. परिणामतः अर्जदार क्र.१ ते ३ यांनी केलेल्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देणे योग्य व उचीत ठरेल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. अर्जदार यांनी प्रचलीत नियमाप्रमाणे आवश्यक मुद्रांक शुल्क भरलेनंतर मागणीप्रमाणे मयत बाजीराव पंडितराव वाघिरे यांचे वारस **अर्जदार क्र.१** अशोक बाजीराव वाघीरे, **अर्जदार क्र.२** कल्याण बाजीराव वाघीरे, **अर्जदार क्र. ३** बाळासाहेब बाजीराव वाघीरे हे असलेबाबत बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ मधील तरतुदीनुसार वारस प्रमाणपत्र देणेत यावे.

३. अर्जदार यांनी सिव्हील मॅन्युअल प्रकरण १४ मधील परिच्छेद क्र. ३१२ प्रमाणे मुळ वारस प्रमाणपत्रावर नोंद करणेत यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात अधिघोषित करणेत आला)

Digitally signed by MITHUN ASHOK SHINDE
Date: 2026.04.10 18:46:29 +0530

ठिकाण– पाटोदा ( **मिथुन अ. शिंदे** )

दिनांक– १०/०४/२०२६ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पाटोदा.